# जिल्हा परिषद रत्नागिरी

## शिक्षण विभाग (प्राथमिक)

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन

माळनाका, रत्नागिरी - ४१५६१२

दूरध्वनी क्र.:-०२३५२-२७१००६, ई-मेल:-samagra.rtn@yahoo.com/eoprirat5@gmail.com


जा.क्र.रजिप/शिक्षण/ड-८/आर.टी.ई.२५% प्रवेश/३८२४/२०२४-२५ दिनांक :-१६.४.२०२४

वाचले : १) जा.क्र.प्राशिसं/सूचना/RTE-८०१/२०२४/२९५९, दि.०३/०४/२०२४.

२) जा.क्र.प्राशिसं/प्र.प्र./RTE-५२०/२०२४/३१०९, दि.१५/०४/२०२४.

## प्रेस नोट.

### आर.टी. ई. २५% अंतर्गत मोफत शाळा प्रवेश सन २०२४-२५ जिल्हा - रत्नागिरी

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, मधील कलम (१२) (एक) (सी ) व दि.९/०२/२०२४ च्या सुधारित अधिसूचनेतील निकषानुसार सन २०२४-२५ ची **वंचित व दुर्बल व सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग घटकातील मुला/मुलींसाठी** तसेच अनुदानित शाळा, शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व स्वयंअर्थसहाय्यीत मान्यता असणाऱ्या शाळेत इयत्ता १ ली मध्ये प्रवेशाच्या २५% जागा राखीव ठेवण्याची तरतूद आहे सन २०२४-२५ ची आर. टी. ई २५% ऑनलाईन प्रवेश अर्ज करण्याची प्रक्रिया **www.student.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर **RTE Portal /Online Application** या टॅब मध्ये **दि.१६/०४/२०२४** पासून दि.**३०/०४/२०२४** पर्यंत सूरू करण्यात येत आहे.

२५% प्रवेशासाठी जिल्ह्यातील २४३१ शाळांनी नोंदणी केली असून सदर शाळांमध्ये निकषानुसार पात्र विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे RTE २५% जागा प्रवेश राखीव ठेवण्यात आले आहेत.

| अ.क्र. | तालुका | RTE २५% शाळा संख्या | पूर्व प्राथमिक वर्गासाठी रिक्त जागा | इ.१ ली साठी रिक्त जागा | एकूण रिक्त जागा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडणगड | १३८ | ० | १३१६ | **१३१६** |
| २ | दापोली | २६० | ० | १२७८ | **१२७८** |
| ३ | खेड | ३१२ | ० | २८६४ | **२८६४** |
| ४ | चिपळूण | ३३८ | ० | ९२६ | **९२६** |
| ५ | गुहागर | १९२ | ९ | ५२३ | **५३२** |
| ६ | संगमेश्वर | ३१७ | ० | २१६५ | **२१६५** |
| ७ | रत्नागिरी | ३५० | ० | १४५० | **१४५०** |
| ८ | लांजा | २०४ | ० | ७६८ | **७६८** |
| ९ | राजापूर | ३२० | ० | १०५५ | **१०५५** |
| | **एकूण** | **२४३१** | ९ | १२३३६ | **१२३४५** |

**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील, सुधारित अधिसूचना दि. ९/०२/२०२४ नुसार वंचित, दुर्बल व सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग घटकातील मुलांना RTE २५% प्रवेशाच्या अनुषंगाने प्राधान्यक्रम ठरविताना विद्यार्थ्यांच्या निवासस्थानापासून १ कि.मी. पर्यंतच्या अंतरावरील अनुदानित शाळा, शासकीय शाळा/ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व स्वयंअर्थसहाय्यीत शाळा अशा असतील.**

**विद्यार्थ्यांच्या निवासस्थानापासून १ कि.मी. पर्यंतच्या अंतरावर अनुदानित शाळा, शासकीय शाळा/ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा नसतील व १ कि.मी. पर्यंतच्या अंतरावर स्वयंअर्थसहाय्यीत शाळा असेल अशा परिस्थितीत त्या स्वयंअर्थसहाय्यीत शाळेत मुलांना RTE २५% प्रवेश दिले जातील. याच प्रमाणे ३ कि.मी. व ५ कि.मी. च्या अंतरासाठी प्राधान्यक्रम असेल.**

**RTE २५%राखीव प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रे व इतर बाबी.**

I) जन्मतारखेचा पुरावा .

II) जातीचा दाखला आवश्यक आहे. (परराज्यातील जातीचे व उत्पन्नाचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.)

III) उत्पन्नाचा पुरावा - आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना पालकांचे रु.१ लाखपेक्षा कमी उत्पन्न असल्याचा दाखला आवश्यक आहे.सन २०२४-२५ मध्ये प्रवेश घेताना विद्यार्थ्यांच्या पालकांचा सन २०२२-२३ किंवा २०२३-२४ या वर्षाचा उत्पन्न दाखला ग्राह्य धरण्यात येईल. उत्पन्नाचा दाखला संबंधित प्राधिकरण (तहसिलदार कार्यालय) यांनी प्रमाणित केलेला असावा. उत्पन्नाच्या दाखल्याची **पडताळणी** महा ऑनलाईनच्या Portal द्वारे **ऑनलाईन पध्दतीने** करण्यात येईल. तसेच उत्पन्नाचा दाखला म्हणून तहसिदारांचा दाखला, Salary Slip, कंपनिचा किंवा

Employer चा दाखला गृहीत धरता येईल.

IV) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक/ वैद्यकीय अधिक्षक, अधिसूचित जि.शा. रूग्णालयाचा ४० % किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

V) निवासी पुरावा - निवासी पुराव्या करिता रेशनिंग कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, वीज/टेलिफोन देयक, प्रॉपर्टी टॅक्स देयक/ घरपट्टी, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबूक, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट या पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरावा.तसेच शासनाने यापूर्वी अधिसूचना अथवा शासन निर्णयाद्वारे जाहीर केलेले पुरावे ग्राह्य धरण्यात यावेत.(भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत वास्तव्याचा पुरावा दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत आवश्यक राहील. परंतु भाडेकरार हा RTE फॉर्म भरण्याच्या दिनांकाच्या पूर्वीचा असावा व त्याचा कालावधी एक वर्षाचा असावा.

**पालकांसाठी सूचना-**

१) आर.टी.ई.२५%अंतर्गत ऑनलाईन प्रवेश अर्ज करताना जास्तीत जास्त कोणत्याही १० शाळा निवडता येतील. त्यापैकी एका शाळेमध्ये प्रवेश दिला जावू शकतो. विद्यार्थ्यांची निवड ही ऑनलाईन पध्दतीने संगणकीय लॉटरीद्वारे करण्यात येईल.

२) पूर्व प्राथमिक किंवा इ. १ ली मध्ये प्रवेश घेताना ३१ डिसेंबर २०२४ ही मानिव दिनांक असेल.

३) पालकांनी ऑनलाईन अर्ज करताना अचूक व खरी माहिती भरावी. (उदा. निवासाचा पत्ता, जन्म दिनांक, उत्पन्नाचा दाखला, जातप्रमाणपत्र इ.)

४) ऑनलाईन अर्ज भरला किंवा प्रतिक्षा यादीमध्ये नाव आहे म्हणजे प्रवेश निश्चित होईलच असे नाही. ऑनलाईन लॉटरी झाल्यानंतर पात्र लाभार्थींना त्यांच्या RTE Login मध्ये तात्पूरते प्रवेश पत्र दिले जाईल. प्रवेश पत्र व मूळ कागदपत्र पालकांनी संबंधित तालुक्याच्या पंचायत समिती मध्ये जावून कागदपत्राची तपासणी केल्यानंतरच प्रवेश निश्चित होईल याची नोंद घ्यावी.

५) प्रवेशास पात्र (Allotment) झालेल्या विद्यार्थ्यांनी मुदतीत प्रवेश न घेतल्यास मुदतीनंतर शाळेच्या किंवा पालकांच्या कोणत्याही तक्रारींची दखल घेण्यात येणार नाही.

६) पालकांनी ऑनलाईन अर्ज भरताना कोणतेही कागदपत्र RTE पोर्टलवर जोडण्याची (अपलोड) करण्याची आवश्यकता नाही. मात्र उत्पन्नाच्या दाखल्यावरील बारकोड खाली दिलेला नमूद क्रमांक ऑनलाईन अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक असल्यास तो नमूद करावा. प्रमाणपत्र योग्य असल्याची खात्री (Validation) ऑनलाईन व्यवस्थेद्वारे होईल.

७) सामाजिक वंचित संवर्गासाठी जात प्रमाणपत्र - अनु.जाती, अनु.जमाती, विमूक्त जाती- अ, भटक्या जमाती - ब, क, ड, इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग, या प्रवर्गांना उत्पन्न दाखल्याची आवश्यकता नाही. परंतु (वडीलांचा किंवा बालकाचा) जात प्रमाणपत्र आवश्यक आहे. तथापि आर्थिक दुर्बल संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न प्रमाणपत्र आवश्यक आहे.

८) पालकांनी बनावट/बोगस कागदपत्रांचा/ उत्पन्नाच्या दाखला इ. चा वापर २५% प्रवेशाकरिता करु नये, तसे केल्याचे निदर्शनास आल्यास, झालेले प्रवेश रद्द करण्यात येतील व संबंधित पालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९) ज्या पालकांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना Single Parent (विधवा, घटस्फोटित , आई अथवा वडील यापैकी कोणताही एक) पर्याय निवडला असेल तर संबंधित बालकाचे पालकत्व स्विकारलेल्या व्यक्तिचे प्रवेशासाठी लागणारे आवश्यक कागदपत्र ग्राह्य धरण्यात येतील.

१०) ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेला एका पालकाचा एकच अर्ज प्रवेश प्रक्रियेसाठी विचारात घेतला जाईल. त्यामुळे एका पालकाने अनेक अर्ज करू नयेत. अपूर्ण व चूकिच्या माहितीचे अर्ज बाद केले जातील..

११) ज्या बालकांनी यापूर्वी RTE 25% अंतर्गत शाळेत प्रवेश घेतला आहे. अशा बालकांना पुन्हा अर्ज करू नये.

१२) अधिक माहितीसाठी **www.student.maharashtra.gov.in** या संकेतस्थळाच्या RTE Portal/ Online Application या टॅब वर भेट द्यावी.

पालकांनी आपल्या पाल्याचे फॉर्म वरील संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने अचूक माहितीसह भरावेत. असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी केले आहे.

**( बी. एम. कासार )**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**

प्रत

१) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती सर्व.
२) जि.प. रत्नागिरी संकेतस्थळावर (www.zpratnagiri.org) प्रसिध्दीसाठी.
३) पत्रकार यांना वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दीसाठी